**अपर पोलीस महासंचालक /संचालक, दळणवळण व परिवहन,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,**
**(पोलीस बिनतारी संदेश)**
डॉ.होमी भाभा रोड, चव्हाणनगर, पुणे ४११००८
दूरध्वनी : ०२०-२५६५६९०८ (कार्यालय), ०२०-२५६५२५० (जनरल),
फॅक्स : ०२०-२५६५७९७४, ईमेल : dirpolwireless.pune@nic.in

क्र.आस्था-२/ई-४/निसू-२१-२२/सपोउनि(वींतं)-पदो/२०२२ /२२७५ पुणे, दिनांक : १९/०५/२०२२

**विषय :-** **निवडसूची २०२१-२०२२**
पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस हवालदार (वीजतंत्री) यांचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (वीजतंत्री) पदी पदोन्नतीवर नियुक्तीबाबत.

**संदर्भ :-**
१) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि.२५/०५/२००४
२) महाराष्ट्र पोलीस(सुधारणा) सन २०१४, दि.२५/०६/२०१४ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सुधारणा) सन २०१५, दि.०६/०४/२०१५
३) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२/ए/१६-ब, दि.२९/१२/२०१७
४) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि.०१/०८/२०१९
५) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक १८/०२/२०२१

--- ००० ---

**आदेश :-**

उपरोक्त संदर्भामध्ये नमूद शासन निर्णय व अधिसूचनांचे पालन करुन, पोलीस बिनतारी संदेश विभागातील खालील नमूद केलेल्या पोलीस हवालदार (वीजतंत्री) यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या घटकात त्यांची सहायक पोलीस उपनिरीक्षक (वीजतंत्री) या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कार्यभार ग्रहण केल्याच्या दिनांकापासून खालील अटींचे अधीन राहून पदोन्नतीवर पदस्थापना करण्यात येत आहे.

पोलीस हवालदार (वीजतंत्री) : वेतन मॅट्रिक्स स्तर एस-८ रु.२५५००-८११००/-
सहायक पोलीस उपनिरीक्षक (वीजतंत्री) : वेतन मॅट्रिक्स स्तर एस-१० रु.२९२००-९२३००/-

| अ. क्र. | पोलीस हवालदार (वीजतंत्री) यांचे नाव | सध्याच्या नेमणूकीचे कार्यालय | सहायक पोलीस उपनिरीक्षक (वीजतंत्री) पदोन्नतीवरील नेमणूकीचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | बर्गे दत्तात्रय पांडूरंग | संचालक कार्यालय, पुणे | संचालक कार्यालय, पुणे | रिक्त पदामध्ये |
| २ | पाटील राजेंद्र रामदास | राज्य आपत्ती प्रतिसाद दल ,धुळे | पोलीस आयुक्त, ठाणे शहर | रिक्त पदामध्ये |
| ३ | पाटील गजानन पंढरीनाथ | पोलीस आयुक्त ठाणे शहर | पोलीस आयुक्त, मुंबई शहर | रिक्त पदामध्ये |
| ४ | त्रिभुवन ज्ञानेश्वर काशिनाथ | संशोधन व विकास, संचालक आस्थापना, पुणे | संचालक कार्यालय, पुणे | रिक्त पदामध्ये |
| ५ | चांदगुडे अनिल विनायक | संशोधन व विकास, संचालक आस्थापना, पुणे | पोलीस आयुक्त, पुणे शहर | रिक्त पदामध्ये |
| ६ | शेख समियोद्दीन फसियोद्दीन | पोलीस अधीक्षक उस्मानाबाद | पोलीस अधीक्षक, गडचिरोली | रिक्त पदामध्ये |

| अ. क्र. | पोलीस हवालदार (वीजतंत्री) यांचे नाव | सध्याच्या नेमणूकीचे कार्यालय | सहायक पोलीस उपनिरीक्षक (वीजतंत्री) पदोन्नतीवरील नेमणूकीचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| ७ | माहुरे रामचंद्र प्रल्हाद | पोलीस अधीक्षक अकोला | पोलीस आयुक्त, नागपूर शहर | रिक्त पदामध्ये |
| ८ | राऊत सुरेश सदाशिव | पोलीस आयुक्त अमरावती शहर | पोलीस आयुक्त, मुंबई शहर | रिक्त पदामध्ये |
| ९ | पिंगे संजयकुमार विष्णुपंत | पोलीस अधीक्षक घोट रिपीटर गडचिरोली | पोलीस आयुक्त, मुंबई शहर | रिक्त पदामध्ये |
| १० | थूल रुपकुमार भाऊराव | पोलीस अधीक्षक आटपाटी/गडचिरोली | पोलीस आयुक्त, मुंबई शहर | रिक्त पदामध्ये |
| ११ | मानकर विनोद बाणाजी | पोलीस आयुक्त नागपुर शहर | पोलीस आयुक्त, मिरा भाईंदर वसई विरार | रिक्त पदामध्ये |
| १२ | पाटील राजेंद्र आनंदा | पोलीस आयुक्त ठाणे शहर | पोलीस आयुक्त, नवी मुंबई | रिक्त पदामध्ये |
| १३ | गोल्हर मेघराज बापुरावजी | पोलीस अधीक्षक वर्धा | पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड | रिक्त पदामध्ये |
| १४ | झरे संजय तुकाराम | पोलीस आयुक्त मुंबई शहर | पोलीस अधीक्षक, सातारा | रिक्त पदामध्ये |

**अटी व शर्ती**

०१) पो.हवा.(वीजतंत्री) ते सहा.पो.उपनि.(वीजतंत्री) पदावर देण्यात येणाऱ्या वरील सर्व पदोन्नत्या ह्या मा.उच्च न्यायालयाचे मुंबई खंडपीठापुढील दाखल याचिका क्र.२७९७/२०१५ व याचिका क्र.४७०/२००५ मधील अंतिम निर्णयाच्या तसेच मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या तसेच शासन निर्णय दिनांक १८/०२/२०२१ च्या अधीनस्त राहून निव्वळ तात्पुरती पदोन्नती देण्यात आलेली आहे.

०२) उपरोक्त पदोन्नती झालेल्या अंमलदाराविरुद्ध गुन्हा दाखल झाला असेल/ निलंबनाची कार्यवाही केलेली असेल/ न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असेल / ते एखादी शिक्षा भोगत असतील तर संबंधित घटकप्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांचेविरुद्धच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास तात्काळ फॅक्सद्वारे पाठवावी आणि पुढील आदेशाची वाट पाहावी.

०३) उपरोक्त पदोन्नत अंमलदार सध्या एखादी शिक्षा भोगत असतील अथवा यापुर्वी देण्यात आलेल्या सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नाही अशा अंमलदाराकडून त्यांना भविष्यात होणारी शिक्षा ते पदोन्नतीच्या पदात भोगणेस तयार असल्याबाबत, दिनांकीत स्वाक्षरी केलेले लेखी हमीपत्र घेऊन, सदर हमीपत्राच्या अधीन राहूनच, पदोन्नतीवर सोडण्यात यावे तसेच संबंधित अंमलदारांना पदोन्नतीवर कार्यमुक्त केलेल्या आदेशातही तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. सदर आदेशाची व संबंधितांच्या लेखी हमीपत्राची प्रत या कार्यालयास सादर करावी. जर त्यांनी लेखी संमती देण्याचे नाकारल्यास तसे या कार्यालयास तात्काळ कळविण्यात यावे.

०४) पदोन्नती दिलेल्या अंमलदारांपैकी ज्या अंमलदारांना सदरची पदोन्नती स्वीकारण्याची इच्छा नाही अशा अंमलदारांचे लेखी अर्ज ०७ दिवसांत या कार्यालयास सादर करण्याची संबंधित प्रभारी अधिकारी यांनी नोंद घ्यावी.

०५) पदोन्नती आदेश प्राप्त झाल्यानंतर जे अंमलदार पदोन्नती स्वीकारणार नाहीत किंवा विविध सबबीखाली पदस्थापना स्वीकारण्यास टाळाटाळ करतील त्यांना आश्वासित प्रगती योजनेंतर्गत देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील.

०६) जे अंमलदार रजेवर/गैरहजर/रुग्णता रजेवर असतील, ते प्रत्यक्ष कार्यभार स्वीकारलेल्या दिनांकापासून पदोन्नतीस पात्र राहतील.

०७) सदरची पदोन्नतीवरील नियुक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील तरतूदीनुसार करण्यात येत आहे.

०८) पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदातील वेतनवाढीनंतर वेतन निश्चितीकरीता द्यावयाच्या विकल्पासंबंधी शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पीवाय/१९८२/सीआर-११७(एक)/एसईआर-३, दि.०६.११.१९८४ व शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.वेपूर१२०९/प्र.क्र.२७/सेवा-५, दि.२२.०४.२००९ तील तरतूदींची माहिती संबंधित पदोन्नती झालेल्या अंमलदारास द्यावी. असा विकल्प द्यावयाचा असेल तर त्यांनी पदोन्नती मिळाल्या तारखेपासून एक महिन्याचे आत असा विकल्प द्यावा. मुदतीत विकल्प न प्राप्त झाल्यास तो ग्राह्य धरला जाणार नाही आणि त्यांची वेतननिश्चिती विनाविकल्प म.ना.से. (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११(१) (अ) प्रमाणे करण्यात येईल याची संबंधितांस समज द्यावी.

०९) कालबद्ध पदोन्नती/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ यापुर्वी घेतला असल्यास, आदेशातील संबंधित अंमलदारास पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती अनुज्ञेय असणार नाही. संबंधित अंमलदार पदोन्नती स्वीकारण्यास तयार नसतील व ते सध्या से.आ.प्र.यो.नुसार वरिष्ठ वेतनश्रेणी घेत असतील तर त्यांची कालबद्ध पदोन्नती (वरिष्ठ वेतनश्रेणी) /सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ काढून घेण्यात यावा आणि त्याप्रमाणे अहवाल सादर करावा.

२. उपरोक्त नमूद अटी व शर्तींमधील प्रतिकूल बाबी नसल्यास, पदोन्नती झालेल्या पो.हवा.(वीजतंत्री) यांना पदोन्नतीवरील नियुक्तीच्या ठिकाणी **तात्काळ कार्यमुक्त करुन,** त्यांना कार्यमुक्त केल्याचा दिनांक आणि स.पो.उ.नि. (वीजतंत्री) पदाचे पदोन्नतीचा कार्यभार स्वीकारल्याचा दिनांक या कार्यालयास उलट टपाली कळवावा. तसेच सदरील अंमलदार हे पदोन्नतीवर बदली झालेल्या ठिकाणी या आदेशाचे तारखेनंतर एक महिन्याचे आत हजर न झाल्यास, त्यांची सेवाज्येष्ठता ते पदोन्नतीवर हजर होतील त्या तारखेपासून धरण्यात येईल. तसेच संबंधित आस्थापना अधिकारी यांनी पदोन्नती झालेल्या अंमलदाऱ्यांच्या सेवापटामध्ये पदोन्नतीच्या आदेशाचा क्रमांक व दिनांकाची नोंद घ्यावी.

**३. पदोन्नती झालेल्या सर्व पोलीस हवालदार (वीजतंत्री) यांचे आम्ही अभिनंदन करीत आहोत आणि पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा देत आहोत.**

19/5

**( संजय येनपूरे )**
पोलीस उप महानिरीक्षक
पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग, पुणे

प्रति,

पोलीस आयुक्त, मुंबई शहर / ठाणे शहर / अमरावती शहर / नागपूर शहर/ पुणे शहर/ मिरा भाईंदर/नवी मुंबई / पिंपरी चिंचवड

पोलीस अधीक्षक, राज्य आपत्ती प्रतिसाद दल धुळे / उस्मानाबाद / अकोला / गडचिरोली / वर्धा / सातारा

पोलीस उप अधीक्षक बि.संदेश, मध्यवर्ती भांडार / संशोधन व विकास / मुख्यालय, पुणे.

पोलीस उप अधीक्षक बि.सं., अमरावती परिक्षेत्र / नाशिक परिक्षेत्र / गडचिरोली परिक्षेत्र / औरंगाबाद परिक्षेत्र / नागपूर परिक्षेत्र /नांदेड परिक्षेत्र/ नागपूर परिक्षेत्र

प्रत :	पोलीस अधीक्षक बि.सं., पश्चिम विभाग, पुणे/पूर्व विभाग, नागपूर
पोलीस उप आयुक्त, बि.सं.,मुंबई.
सहायक पोलीस आयुक्त बि.सं., मुंबई शहर / ठाणे शहर / अमरावती शहर / नागपूर शहर/ पुणे शहर/ मिरा भाईंदर/नवी मुंबई / पिंपरी चिंचवड
पोलीस निरीक्षक बि.सं., राज्य आपत्ती प्रतिसाद दल धुळे / उस्मानाबाद / अकोला / गडचिरोली / वर्धा / सातारा

**स्थानिक प्रत :-**

पोलीस निरीक्षक बि.सं., गोनपायो, पुणे (संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी)
प्रमुख लिपीक, लेखा शाखा / आस्थापना शाखा-२/ परवाना शाखा (राजपत्रामध्ये प्रसिद्धीसाठी)